# डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली

## आजपर्यंत विद्यापीठांनी संयुक्त कृषि संशोधन व विकास समितीव्दारे संशोधन शिफारशी केलेले पिकनिहाय तंत्रज्ञान

| पीक व वाण | : | वांगी |
|---|---|---|
| **शिफारशींचा तपशिल (वर्षनिहाय)** | : | **वर्ष - २०११** |
| लागवडीविषयी तंत्रज्ञान व शिफारशी | : | उत्तर कोकण किनारपट्टी विभागात “भात-वांगी” पीकपध्दती सर्वाधिक फायदेशिर असून तिचा अवलंब करावा अशी शिफारस करण्यात येते. |
| **शिफारशींचा तपशिल (वर्षनिहाय)** | : | **वर्ष - २०१२** |
| लागवडीविषयी तंत्रज्ञान व शिफारशी | : | कोकण विभागात रब्बी हंगामात वांग्याचे अधिक उत्पादन घेण्यासाठी जिवाणूजन्य मर रोगास प्रतिकार करणाऱ्या “अर्का निधी” या वाणाची लागवडीसाठी शिफारस करण्यात येत आहे. |
| **शिफारशींचा तपशिल (वर्षनिहाय)** | : | **वर्ष - २०१३** |
| पाणी व्यवस्थापनाबद्दल शिफारशी | : | कोकण विभागातील जांभ्या जमिनीवर वांगी पिकापासून अधिक उत्पादन आणि आर्थिक फायदा मिळविण्यासाठी ५० × ५० - १७५ से.मी. अंतरावर जोडओळी पध्दतीने लागवड करुन ठिबक सिंचनाद्वारे एकत्रित बाष्पीभवनाच्या ६० टक्के पाणी एक दिवसाआड शिफारसीच्या मात्रेच्या ८० टक्के विद्राव्य खते (१२०:४०:४० कि.ग्रॅ./हे.) १५ दिवसांच्या अंतराने ८ वेळा विभागून देण्याची शिफारस करण्यात येत आहे. |
| **शिफारशींचा तपशिल (वर्षनिहाय)** | : | **वर्ष - २०१६** |
| पीक व्यवस्थापनाबद्दल इतर शिफारशी | : | महाराष्ट्रातील दक्षिण कोकण किनारपट्टीच्या विभागात खरीप भात-मधुमका व खरीप भात- वांगी या पिकपध्दतीचा अधिक उत्पादन व नफा मिळविण्यासाठी अवलंब करावा. |
| **शिफारशींचा तपशिल (वर्षनिहाय)** | : | **वर्ष - २०१७** |
| पीक व्यवस्थापनाबद्दल इतर शिफारशी | : | उत्तर कोकण किनारपट्टी विभागात “भात-वांगी” अणि “भात-मधुमका” पिक पध्दतीपासून संसाधन संवर्धनासह अधिक उत्पादन आणि आर्थिक फायदा मिळण्यासाठी सदर पिक पध्दती कमीत-कमी मशागतीवर १२५ टक्के शिफारशीत खत मात्रेसह वांगी आणि मधुमका पिकांना हेक्टरी ३ टन भात पेंढ्याचे आच्छादन वापरण्याची शिफारस करण्यात येते. |